GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, JALGAON
(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगाव
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
National High 6, Jalgaon-425002 | राष्ट्रीय महामार्ग ६, जळगाव ४२५००२

# अल्पसंख्यांक मुलींचे वसतीगृह प्रवेशाबाबत नियमावली

१.महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन निर्णय वसगृ-२०११/प्र.क्र.१३०/का.८, दि.२०/१२/२०११ व शासन निर्णय वसगृ-२०१२/प्र.क.१६८/का.८, दि.२१/०६/२०१३ व दि.०५/०९/२०१४ च्या तरतुदीप्रमाणे ७०% जागा अल्पसंख्याक समाजातील पदवी व पदव्युत्तर उच्च शिक्षण घेणा-या मुलींसाठी राखीव असतील तर उर्वरित ३०% जागा बिगर अल्पसंख्याक समाजीतील पदवी व पदव्युत्तर उच्च शिक्षण घेणा-या मुलींमधून शासनाच्या प्रचलित आरक्षणानुसार भरण्यात येतील. अल्पसंख्याक समाजातील मुलींचे अर्ज पुरेशा प्रमाणात प्राप्त झाले नसल्यास इतर प्रवर्गातील मुलींना प्रवेश देता येईल.

२.शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथील अल्पसंख्यांक समाजातील मुलींना प्रवेशास प्रथम प्राधान्य देण्यात येईल तदनंतर जागा शिल्लक राहील्यास जळगाव शहरातील इतर महाविदयालयातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींना प्रवेशासंबंधी कार्यवाही करण्यात येईल.

३.खालील प्रमाणे जागेचे वाटप करण्यात येईल.

७०% जागा अल्पसंख्याक समाजासाठी तर ३०% जागा बिगर अल्पसंख्याक समाजीतील मुलींसाठी शासनाच्या प्रचलीत आरक्षणानुसार

| ७० % जागांचे वाटप | ३० % जागांचे वाटप |
|---|---|
| मुस्लीम - ३५ | अनुसुचित जाती १३% - ०४ जागा |
| बौध्द - २१ | अनुसुचित जमाती ७% - ०२ जागा |
| ख्रिश्चन - ०६ | VJ / NT ११% - ०३ जागा |
| जैन - ०६ | विशेष मागास प्रवर्ग २% - ०१ जागा |
| शिख - ०१ | इतर मागास प्रवर्ग १९% - ०६ जागा |
| पारशी -०१ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग १०% - ०३ जागा |
| | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक १०% - ०३ जागा |
| | अराखीव २८% - ०८ जागा |

४.अल्पसंख्याक समाजातील मुलींचे अर्ज पुरेशा प्रमाणात प्राप्त झाले नसल्यास इतर प्रवर्गातील मुलींना प्रवेश देण्यात येईल. त्यासाठी इच्छुक मुलींकडुन अर्ज घेण्यात येईल. प्रवेशासाठी गुणानुसार व शासनाच्या प्रचलीत आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येईल. प्रवेशाबाबतचा निर्णय संबंधित संस्थेचे प्राचार्य व त्यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत घेण्यात येईल. पात्र विदयार्थीनी प्रवेशापासुन वंचित राहणार नाहीत याची दक्षता समिती मार्फत घेण्यात येईल.

५.शुल्क आकारणी : वसतीगृहात प्रवेश घेणा-या मुलींसाठी प्रत्येक वर्षासाठी सर्वसाधारणपणे ५७००/- शुल्क आकारणी करण्यात येईल.

६.अल्पसंख्याक समाजातील कुंटुबाचे वार्षिक उत्पन्न रू. ८,००,०००/- पेक्षा कमी आहे अशा मुलींसाठी शुल्क पुर्ण माफ असेल व अश्या विदयार्थीनींना प्रवेशाकरीता प्राधान्य देण्यात येईल.

७.इतर कुठल्याही कारणास्तव जर संबंधित विदयार्थीनीने प्रवेश रदद केला असल्यास प्रतिक्षा यादीतील विदयार्थीनींना गुणवत्तेप्रमाणे व शासनाच्या प्रचलीत आरक्षणानुसार प्रवेश देण्यात येईल.

८.जेवन नाश्ता इ. चा खर्च वसतीगृहात वास्तव्य करणा-या विदयार्थीनींना स्वत: भागवावा लागेल.

९.प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :-

i) जन्म दाखला
ii) वार्षिक उत्पन्नाचा दाखला मागील तीन वर्षाचा
iii) HSC व मागील शैक्षणिक वर्षाची गुणपत्रिका
iv) जातीचा दाखला
v) अल्पसंख्याक समाज असल्याचे सक्षम अधिका-याकडुन प्राप्त दाखला
vi) सध्या शिकत असलेल्या शैक्षणिक संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र
vii) सध्या शिकत असलेल्या शैक्षणिक संस्थेचे ओळखपत्र

२९/०६/२०२४

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय
जळगांव